33/2018

VR 2017-18

University Amravati Sponsored

One Day National Conference on

# Role of Home Economics in Women's Empowerment

31st January 2018

Women striving for Success


## RESEARCH DEMAGOGUE

SPECIAL ISSUE JANUARY 2018

UGC Approved Journal No.44476 www.ycjournal.net

Impact Factor : 5.210


# SOUVENIR

# (PROCEEDING BOOK)

**Organized by**


**Department of Home Economics**

Bapuraoji Butle Arts, Narayanrao Bhat Commerce & Bapusaheb Patil Science College Digras, Dist.Yavatmal, (MS) India. Pin Code 445203

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)

NAAC ACCREDITED

Contact : 07232 220022, Website : www.bnbcollegedigras.com


**In Collaboration with**


**Women's Studies Centre,**

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

**And**

**D.V.S.P.Mandal's Digras, Dist.Yavatmal, 445203.**





Scanned by TapScanner






| | |
|---|---|
| ३५ | महिला सबलिकरण आणि पंचायत राज व्यवस्था<br>डॉ. ए. डी.जाधव (सहा.प्राध्यापक) |
| ३६ | भारतीय महिलांचा राजकीय सक्षमीकरणाचा स्तर या दृष्टिकोनातून औरंग<br>महानगरपालिकेतील नगरसेविकांच्या कर्तव्याचा अभ्यास<br>प्रा.जीवनज्योती निकाळजे (म्हस्के), डॉ.जयश्री गोडसे |
| ३७ | महिला सक्षमीकरणामध्ये गृहअर्थशास्त्राची भूमिका<br>*प्रा.डॉ. बबीता अ.हजारे* |
| ३८ | सामाजिक प्रक्रियेमुळे बदललेली स्त्री<br>*कु.श्यामल गजानन देशमुख* |
| ३९ | भारतीय स्त्रियांच्या सशक्तीकरणाची स्तर/स्थिती<br>*प्रा.कु.सुषमा ज. फरसोले* |
| ४० | भारतीय महिलांचे सबलीकरण<br>*प्रा. कु. प्रीती प. गावंडे* |
| ४१ | स्वंयरोजगार आणि स्त्रीसक्षमीकरण<br>*प्रा.स्वाती एस. वैद्य* |
| ४२ | स्त्री सक्षमीकरणात गृहअर्थशास्त्राची भूमिका<br>*प्रा. प्राची भांबुरकर, विधळे* |
| ४३ | महिला सशक्तीकरण : एक चिकित्सक अभ्यास<br>*—सहा.प्रा.कु.पी.एम.सोनपरोते* |
| ४४ | महीलांच्या सशक्तीकरणापुढील आव्हाने व उपाय<br>*डॉ. अल्पना देवकर (बीनिवाले)* |
| ४५ | पुसद शहरातील यशस्वी स्त्री उद्योजिका एक अभ्यास<br>*प्रा. रंजना एच. जीवने* |
| ४६ | औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण काळाची गरज<br>*डॉ.जीजा राऊत* |
| ४७ | ग्रामीण महीला उदयोजकता विकासात बचत गटाची भूमीका<br>प्रा.सौ.वैशाली रा.मोरे |
| ४८ | महिलांचे सक्षमीकरण जाणीव निर्माण करून विकासाची वाटचाल<br>*कु.सीमा पंजाबराव भुईभार, प्रा.डॉ.सुजाता ब. सबाने* |
| ४९ | महिला सक्षमीकरणात स्वयं—सहाय्यता बचत गटाचे योगदान<br>*सौ.सारीका एन् दांडगे(घोदडे)* |




*Scanned by TapScanner*

# ग्रामीण महीला उदयोजकता विकासात बचत गटाची भूमीका

प्रा.सौ.वैशाली ग.मोरे
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महा.
मेहकर, जि.बुलढाणा

**प्रस्तावना –**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सर्वार्थाने सक्षम बनविणे होय. समाजातील महिलांना दुयम स्थान दिल्याने स्त्री–पुरूष विषयता निर्माण झाली. व पुरूषप्रधान संस्कृती अस्तित्वात आली. व स्त्री सक्षम असुनही सर्वांगीण प्रगतीत ती मागे पडत गेली. ज्यावेळी समाजात स्त्री–पुरूष समानता येईल त्यावेळी स्त्री ख–या अर्थाने सक्षम होईल.

कोणत्याही समाजात स्त्रियांना त्यांचे मुलभूत अधिकार, समानतेची वागणूक, वैचारीक स्वातंत्र्य मिळाल्यास स्त्री सबलीकरणाच्या संकल्पनेनुसार स्त्रियांची सर्वांगीण प्रगती होईल. एक सक्षम स्त्री आपल्या कुटूंबाचा विकास करू शकते व कुटूंबाचा विकास झाला तर संपूर्ण समाजाचा विकास होऊन पर्यायाने राष्ट्राची प्रगती होते.

**ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण**

भारतातील बहुसंख्य ग्रामीण महीला द्रारिद्रयात राहतात. त्याच्या क्षमतांची जाणीव करून देऊन ग्रामीण महिला सक्षमीकरणावर भर दिला गेला पाहिजे. ग्रामीण महिलांचे संघटन होणे गरजेचे आहे. त्यांच्या अंतर्गत क्षमतांचा विकास घडवुन आणण्यासाठी त्यांना मार्गदर्शन व पाठींबा दिला गेला पाहिजे. दारिद्रेषेखालील महिलांना सहजपणे कर्ज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. देशाच्या सामजिक व आर्थिक विकासात ग्रामीण महिला सक्षमीकरणाची भूमिका महत्वाची आहे.

**ग्रामीण महिला सक्षमीकरण व बचत गट**

ग्रामीण विकासाची धुरा खऱ्या अर्थाने महिलांच्या खांदयावर आहे. ग्रामीण महीला हया पुरूषांच्या बरोबरीने काम करतात. ८५% ग्रामीण महीला हया शेतमजुरी मोलमजुरी करतांना दिसून येतात. महिलांना संघटीत करण्यासाठी विकास प्रक्रीया व निर्णय प्रक्रीयेत ग्रामीण महिलांचा सहभाग महत्वाचा आहे. आज बचतगट महिला विकासाचा केंद्रबिंदू बनत आहेत.

**बचतगट–संकल्पना**

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने बांगलादेशातील नोबेल पुरस्कार प्राप्त डॉ.महम्मद युनूस हयांनी महिला बचतगटाची संकल्पना मांडली. व हयाद्वारे ग्रामीण महीला सक्षमीकरणास प्रारंभ झाला. स्वयंसहायता बचत गटाद्वारे महिला आत्मनिर्भर होवु लागल्या. नियमीतपणे केलेल्या अल्पबचतीतुन आर्थिक सहाय्य करण्यासाठी, बीज भांडवल उभे करण्यासाठी, संघटन शक्ती वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने, नेतृत्वाने तयार झालेला गट म्हणजे बचतगट होय. नियमीत बचतीच्या माध्यमातून छोटया मोठया आर्थिक गरजा भागवुन ग्रामीण महिला स्वंयपुर्ण व आर्थिकदृष्टया स्वावलंबी होऊ लागल्या. महाराष्ट्रातील ३३ जिल्हयात १५५४९९ इतके बचतगट असुन बहुतांश बचतगटांनी व्यवसाय सुरू केलेले आहेत.

**बचत गटाचे फायदे –**

ग्रामीण भागातील स्त्रियांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात हयाकरीता सर्व स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. बचतगटाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांना होणारे फायदे.

– बचतगटामुळे स्त्रियांमध्ये स्वप्रयत्न व आत्मविश्वास वाढत जातो.
– महिलांना विचार विनिमयासाठी व्यासपीठ मिळते.
– महिलांना उत्पादक कार्यात सहभागी होण्याची संधी मिळते.
– वैचारीक स्वातंत्र्य मिळाल्याने त्या आपले विचार परखडपणे मांडु शकतात.
– महिला आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर होतात.
– सामाजीक विकासात महिलांची भूमीका महत्वाची ठरते व त्या सामाजीक समस्या सोडविण्यास महिला पुढाकार घेतात.
– राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

**बचत गटाद्वारे निर्माण झालेली उद्योजकता**

संघटीत ताकद व पारदर्शक सहकाराची प्रक्रिया जर एकत्रित आली ता विविध प्रकारची उद्योजकता निर्माण होते. कोल्हापुर जिल्हयातील मानकर वाडीच्या सरस्वती महिला बचत गटाने दुग्ध



Scanned by TapScanner

व्यवसायाच्या माध्यमातून ४०० लोकवस्ती असलेल्या छोट्याश्या गावाचा कायापालट केला.

सोलापूर मधील जेजुर येथील जीवनज्योती महिला बचत गट हा सॅनीटरी नॅपकीन्स बनविणारा महाराष्ट्रातील पहीला महिला बचत गट आहे.

लिज्जत पापड सारखे मोठे गृहउद्योग आज कित्येक महिलांचे प्रेरणास्थान आहे.

व्यवसायाची पूर्वतयारी व प्राथमिक जबाबदारी स्विकारल्यानंतर गृहीणी आपला गृहउद्योक सुरू करू शकते हयामध्ये संरक्षक अन्नपदार्थ तयार करणे मसाले तयार करणे, खानावळ चालविणे, भोजनाच्या ऑर्डर स्विकारणे कला कुसरिच्या वस्तु तयार करणे,नर्सरी शिवणकाम, विणकाम, क्लासेस, आंतरसजावट अशा अनेक व्यवसायापैकी आपल्या आवडीचा व्यवसाय निवडुन अनेक स्त्रिया स्वयंपुर्ण झाल्या आहेत.

वाढती बेरोजगारी लक्षात घेता स्वयंरोजगार काळाची गरज बनली आहे. त्याचबरोबर गृहीणीच्या कलागुणांना वाव देणे, जागृत करून त्यांना आत्मनिर्भर करणे हयादृष्टीने स्वयंरोजगार महत्वाचा उरतो.

## निष्कर्ष:—

स्वंयसहायता बचतगट महिलांच्या आर्थिक सामाजिक वाढीस सहाय्यकच ठरत आहेत.

— बचतगटाच्या माध्यमातून महिलांमधील सुप्तगुणांना प्रोत्साहन मिळते. स्वयंरोजगाराच्या माध्यमातुन दारिद्रय दुर होऊन आर्थिक विकास होत आहे. बचतगटांची वाढती संख्या ग्रामीण महीला सक्षमीकरणाची निर्देशांक आहे. बचतगटाच्या माध्यमातून स्त्रियांची वैचारीक देवाण—घेवाण होऊन त्यांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढलेला आहे. तसेच त्यांच्या मासीक उत्पन्नात वाढ झालेली आहे.

ग्रामीण भागातील महिलांच्या बचतगटातील सहभागामुळे त्यांच्या सामाजिक स्थान विचारसरणी, निर्णय क्षमता हयांचा विकास व्यवहार करतांना दिसतात. तसेच स्वंयरोजगारासाठी आवश्यक प्रशिक्षणही घेतात.

ग्रामीण महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासात स्वंयसहायता बचतगटाची भूमिका अत्यंत महत्वपुर्ण आहे.

## संदर्भ—

१) मानवी हक्क — प्रा.व्ही.बी.पाटील

२) महिला बचतगट हस्तपुस्तिका — राजेश चौधरी

३) बचतगट स्वयंसहाय्यसाठी उपकारक योजना— डॉ.लिला पाटील

४) बचतगटासाठी स्वयंरोजगाराचे ५१ महामार्ग —एस.बी.पवार

५) गृहअर्थशास्त्राची मुलतत्वे — सौ.लिना कांडलकर

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Menkar,Dist.Buldana

Smt.Sindhutai Jadhav Maha Menkar 330



Scanned by TapScanner